# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, इगतपुरी,
## विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल: igatpuri.amfu@gmail.com

**४०) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २६.०५.२०२३**

**जिल्हा : नाशिक**

| मागील आठवड्यातील हवामान (२०/०५/२०२३ ते २६/०५/२०२३) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (२७/०५/२०२३ ते ३१/०५/२०२३) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | दिनांक | २७ | २८ | २९ | ३० | ३१ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | पाऊस (मिमी) | २ | ० | ० | ३ | ४ |
| ३७.० | ३६.५ | ३६.० | ३६.० | ३६.३ | ३५.६ | ३४.८ | कमाल तापमान (अं. से.) | ३६ | ३५ | ३६ | ३८ | ३९ |
| २२.५ | २३.० | २१.० | २१.० | २३.५ | २३.१ | २३.९ | किमान तापमान (अं. से.) | २३ | २२ | २१ | २२ | २३ |
| निरभ्र | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढग स्थिती (आकाश) | अ:ढगाळ | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | अ:ढगाळ |
| ७३ | ७५ | ६४ | ८१ | ७७ | ८१ | ८० | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७० | ६९ | ७३ | ७० | ७४ |
| २८ | २९ | ३९ | ३५ | ३७ | ४० | ५० | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | २६ | ३० | २५ | २३ | २५ |
| ५.२ | ५.७ | ४.५ | ४.६ | ६.० | ६.५ | ८.३ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | २५ | २२ | १८ | १५ | १७ |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | **हवामानाचा अंदाज लक्ष्यात घेता दि. २७, ३० व ३१ मे रोजी हलक्या पावसाची शक्यता आहे व उर्वरित दोन दिवस हवामान उष्ण राहण्याची शक्यता आहे तसेच आकाश दि. २७, ३० व ३१ मे रोजी ढगाळ राहील व उर्वरित दोन दिवस स्वच्छ राहील. कमाल तापमान ३५-३९ डिग्री सें. व किमान तापमान २१-२३ डिग्री सें. दरम्यान राहण्याची शक्यता आहे तसेच वा-याचा वेग १५-२५ कि.मी/.तास या दरम्यान राहण्याची शक्यता आहे.** |
| सामान्य सल्ला | | **"विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी येथे इंद्रायणी भात वाणाचे प्रमाणित बियाणे तसेच युरिया डी.ए.पी. गोळी खत विक्रीसाठी उपलब्ध असून शेतकरी बांधवांनी केंद्रावर भेट देऊन बियाणे खरेदी करावे". (रु. ६५/- प्रती किलो प्रमाणे १६ किलो गोणीचे दर रु. १०४०/- प्रती गोणी तसेच रु. २५/- प्रती किलो प्रमाणे ३५ किलो गोणीचे दर रु. ८७५/- प्रती गोणी )**<br>शेतकरी बांधवांनी भात व इतर पिकांच्या पेरणीसाठी जमिनीची मशागत करून माती परीक्षण करून घ्यावे. पेरणी करिता सुधारित वाण, खते ई. कृषि निविष्टांची खरेदी करून घ्यावि.<br>खरीप पिकाची पेरणी मान्सुनचे आगमन झाल्यानंतर सलग ३ ते ४ दिवस पुरेसा पाऊस झाल्यानंतर (६५ ते १०० मी.मी.) वाफसा आल्यानंतरच करावी.<br>उन्हाळी भाजीपाला व फळबागांना शक्यतो सायंकाळी ओलीत करावे तसेच पिकामध्ये अच्छादनाचा वापर करावा.<br>उन्हाळी पिकातील जमिनीतील ओलावा टिकविण्यासाठी शेतात गवताचे आच्छादन करावे व ठिबक सिंचनाचा अवलंब करावा.<br>फळपिकांमध्ये शक्यतो खुरपणी करुन घ्यावी व बोर्डोपेस्ट खोडांना लावावे.<br>पिकांना पाणी शक्यतो रात्री द्यावे व उन्हाळी पिके, भाजीपाला व फळबागांमध्ये सूक्ष्म सिंचनाचा (ठिबक व तुषार सिंचन) उपयोग करून पाण्याची बचत करावी.<br>जमिनीची खोल नांगरट करावी त्यामुळे जमिन चांगली तापुन त्यामधील जिवजंतुचा नाश होवुन खरीप पिकातील तणांचे प्रमाण, किड व रोगाचे प्रमाण नियंत्रणात राहण्यास मदत होते.<br>जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी भाजीपाला व फळ झाडांमध्ये मल्चिंग करावी. |

**दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२** **ईमेल:** igatpuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| | | भाजीपाला पिकाला आवश्यकतेनुसार सूक्ष्म सिंचनाद्वारे पाणी देणे.<br>साठवण करावयाच्या कडधान्यांचे किडीपासून संरक्षण करण्यासाठी ३ ते ५ मि.ली. एरंडेल/जवस/करंज/कडुनिंबाचे तेल प्रति किलो धान्य या प्रमाणात वापरावे. |
| संदेश | | हलक्या पावसापासून मळणी किंवा उन्हात वाळविण्यास ठेवलेले पिके/धान्य तसेच पशुधन, कुक्कुट पक्षी आणि स्वतःचे संरक्षण करा. |
| उन्हाळी बाजरी | मळणी | उन्हाळी बाजरा पिकाची मळणी यंत्राच्या सहय्याने लवकरात लवकर करावी. |
| उन्हाळी भुईमुग | साठवणूक | भुईमुग काढणी करतेवेळी शेंगामध्ये ४० ते ५० टक्के ओलावा असतो. काढणी केलेल्या शेंगा वाळवून त्यातील ओलावा १० टक्क्यांपर्यंत कमी करावा. यामुळे शेंगा साठवणुकीमध्ये सुरक्षित राहतात. उन्हात शेंगा वाळविणे ही चांगली व सोपी पद्धत आहे. शेंगामध्ये बुरशी वाढू नये, म्हणून शेंगा लवकर वाळवाव्यात. मात्र उन्हाळी भुईमुगाच्या शेंगा बियाण्यासाठी घेतल्या असतील, तर त्या उन्हात वाळवू नयेत, अन्यथा बियाण्याची उगवणशक्ती कमी होते. |
| खरीप भात | रोपवाटिका व्यवस्थापन | पुनर्लागवड पद्धतीमध्ये उत्पादन कमी येण्याच्या कारणामध्ये रोपवाटिका व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष हे अत्यंत महत्वाचे कारण आहे. त्यामुळे योग्य रोपवाटिका व्यवस्थापन हे फायदेशीर भात शेतीचे मूळ आहे.<br>भात पिकाचे चांगले उत्पादन घेण्यासाठी चारसूत्री भात लागवड तंत्रज्ञानाचा उपयोग करावा. चारसुत्रापैकी पहिले सूत्र रोपवाटीकेसाठी वापरावे जसे भाताच्या तुसाची काळसर राख रोपवाटिकेत बी पेराण्यापुर्वी गादी वाफ्यात मिसळावी. खात्रीशिर व भेसळविरहीत बियाण्यांचा वापर करावा.<br>खरीप हंगामासाठी रोपवाटिकेसाठी बियाण्याची पेरणी पुरेश्या ओलाव्यावरच गादीवाफ्यावर करावी कोरडी पेरणी करू नये. तसेच पेरणीकरिता १ ते १.२० मीटर रुंद व ८ ते १० सें.मी. उंच आणि आवश्यकतेनुसार लांबीचे गादी वाफे तयार करावेत. एक एकर क्षेत्रावरील लागवडीसाठी ४ गुंठे रोपवाटिका पुरेशी होते. १ गुंठा वाफ्यास २५० किलो शेणखत किंवा कंपोष्ट खत आणि १ किलो युरिया खत मातीत मिसळावे. पेरणी ओळीत व विरळ करावी. रोपांच्या जोमदार वाढीसाठी पेरणीनंतर १५ दिवसांनी प्रति गुंठा १ किलो युरिया खत द्यावे.<br>पावसाच्या अभावी व इतर कारणाने लागवड लांबणीवर पडल्यास प्रति गुंठा क्षेत्रातील रोपास १ किलो युरियाचा तिसरा हफ्ता द्यावा. योग्य पाणी व्यवस्थापन करावे. कीड व रोग नियंत्रणाकडे लक्ष्य द्यावे. |
| खरीप बाजरी, सोयाबीन, नाचणी व खुरासणी ई. पिके | पूर्व मशागत | जमिनीची दोन ते तीन वर्षात किमान एकदा उन्हाळ्यामध्ये एक खोल नांगरणी करून, नांगरणीच्या विरुद्ध दिशेने वखराच्या दोन-तीन पाळ्या देऊन जमीन समपातळीत करावी. शेवटच्या पाळीपूर्वी एकरी २ टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोष्ट खत जमिनीत चांगले मिसळावे. शेणखतामुळे जमीन चांगली भुसभुशीत राहते. पिकाच्या मुळ्या खोलवर जाऊन पिकाची जोमदार वाढ होण्यास मदत होते. पेरणीपूर्वी एक वखर पाळी घातल्यास तणांची तीव्रता कमी होते. |
| डाळिंब | फळधारणा आणि फळाची वाढ | पाणी व्यवस्थापनाकडे विशेष लक्ष्य द्यावे. जैवीक आच्छादन करावे. शक्यतो फुट काढणी करू नये.<br>फळांना पेपरबॅग लावून संरक्षण करावे खोड किडीचे नियंत्रण करावे.<br>डाळिंब बागेत सिंचनासाठी ठिबक किंवा सूक्ष्म सिंचन प्रणालीचा वापर करावा.<br>फळे पोखरणारी अळी - अंडी अवस्थेत आढळून आल्यास, कडुनिंब तेल किंवा ॲझाडिरॅक्टिन (१०,००० |

| | | |
|---|---|---|
| | | पीपीएम) ३ मि.लि. प्रति लिटर पाणी या प्रमाणे ७ ते १० दिवसांच्या अंतराने दोनवेळा फवारण्या घ्याव्यात. खराब झालेली किंवा छिद्र असलेली फळे आढळून आल्यास, अशी फळे काढून खड्ड्यात पुरून टाकावीत. सायअॅण्ट्रानिलीप्रोल (१०.२६ ओडी) १.८ मि.लि. किंवा क्लोरअॅण्ट्रानिलिप्रोल (१८.५ एससी) ०.३७५ मि.लि. किंवा टोलफेनपायरॅड (१५ ईसी) २ मि.लि. प्रति लिटर पाणी प्रमाणे फवारणी करावी.<br>मिलिबग - प्रादुर्भावाच्या सुरुवातीच्या अवस्थेत, कडुनिंब तेल किंवा अॅझाडिरॅक्टिन (१०,००० पीपीएम) ३ मि.लि. अधिक करंज तेल ३ मि.लि. प्रति लिटर पाणी प्रमाणे फवारावे. प्रादुर्भाव वाढल्यास, थायमेथोक्झाम (१२.६%) + लॅमडा सायहॅलोथ्रिन (९.५% झेडसी) (संयुक्त कीटकनाशक) ०.५० मि.लि. प्रति लिटर पाणी प्रमाणे फवारणी करावी. |
| आंबा | | नवीन आंबा कलमांच्या लागवडीसाठी निवडलेल्या क्षेत्राची साफसफाई करून घ्यावी. पारंपारिक पध्दतीने लागवडीसाठी १० x १० मीटर अंतरावर व घन पद्धतीने लागवडीसाठी ५ x ५ मीटर अंतरावर १ x १ x १ मीटर आकाराचे खड्डे काढून घ्यावेत. खड्डे चांगली माती, तीन-चार घमेली चांगले कुजलेले शेणखत आणि ३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट या मिश्रणाने भरून तयार ठेवावेत. |
| द्राक्षे | | खरड छाटणीच्या ४५ व्या दिवशी काडीवरील तळापासून पाचवे पान काढून त्याचे देठ वेगळे करावे. साधारणपणे एका प्लॉटमधून १०० ते १२० देठ वेगवेगळ्या ठिकाणावरून घेतले असल्यास देठाचा प्रातिनिधीक नमुना मिळू शकतो. हे देठ शुद्ध पाण्यामध्ये ( डिस्टिल्ड वॉटर ) धुवून प्रयोगशाळेकडे विश्लेषणासाठी पाठवावेत. यामुळे वेलीची अन्नद्रव्यांची सद्यःस्थिती कळेल. त्यानुसार खतांचा वापर व बचत शक्य होईल.<br>उष्ण हवामानाचा अंदाज लक्ष्यात घेता द्राक्ष बागेत अचानक फुटी सुकण्याची समस्या आढळून आल्यास बागेत नवीन फुटी निघत असताना एकतर शेडनेटचा वापर करून फुटी झाकून घ्याव्यात.<br>जवळपास सपकैन होईपर्यंत अधूनमधून पाण्याची फवारणी करत राहावी. यामुळे पानातील पेशींमध्ये योग्य रस टिकून राहण्यास मदत होईल. जमिनीमध्ये मुळांच्या कक्षेत वाफसा स्थिती राहील, अशाप्रकारे पाण्याचे नियोजन असावे. वाढत्या तापमानात सुरुवातीच्या काळात तीन ते चार पाने अवस्थेपासून वेलीला नत्र आणि पाणी पुरेसे मिळेल, याची काळजी घ्यावी.<br>ज्या बागेत विरळणी होऊन फुटींचा जोम टिकून आहे, अशा ठिकाणी सपकैन करणे गरजेचे आहे. |
| खरीप कांदा | रोपवाटिका | एक एकर कांदा लागवडीसाठी २ गुंठे क्षेत्रावर रोपवाटिका तयार करावी. एक एकर लागवडीसाठी २-३ किलो बी पुरेसे होते. पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास २ ग्रॅम कार्बेन्डाझीम हे बुरशीनाशक चोळावे. पेरणीपूर्वी २०० किलो शेणखतासोबत ५०० ग्रॅम ट्रायकोडर्मा व्हीरिडी वापरून जमिनीत मिसळावे. रोपवाटिकेत ठिबक किंवा तुषार सिंचन पद्धती वापरण्यासाठी जमिनीपासून १०-१५ सें.मी. उंच, १-१.२ मीटर रुंद आणि गरजेनुसार लांब गादीवाफे जमिनीच्या उताराला आडवे तयार करावेत. त्यामुळे रोपांची वाढ एकसारखी होते. पाणी फार काळ साचून राहत नाही, त्यामुळे रोपे कुजत किंवा सडत नाहीत. तसेच लावणीच्या वेळी रोपे सहज उपटून काढता येतात. रोपांच्या गाठी जाड व लवकर तयार होतात. वाफे तयार करताना १६०० ग्रॅम नत्र, ४०० ग्रॅम पालाश प्रति २०० वर्ग मीटर यांप्रमाणात खते द्यावीत. रुंदीशी समांतर ५-७.५ सें. मी. अंतरावर रेघा पाडून १-१.५ सें. मी. खोलीवर बियाणे पेरावे. पेरणीनंतर चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खताने बियाणे झाकावे. नंतर झारीने जेमतेम वाफ्यावर फिरेल अशा पध्दतीने पाणी द्यावे. अति उष्णतेमुळे बियांची उगवण व रोपांच्या वाढीवर अनिष्ट परिणाम |

**दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२** **ईमेल:** igatpuri.amfu@gmail.com


| | | |
|---|---|---|
| | | होऊ नये, यासाठी वाफ्यावर दुपारच्या वेळी सावली राहील अशी सोय करावी. तण नियंत्रणासाठी रोपे उगण्यापुर्वी वाफ्यावर पेंडीमिथॅलीन २ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पेरणीनंतर २० दिवसांनी हाताने खुरपणी करून, ८०० ग्रॅम प्रति २०० वर्ग मीटर या प्रमाणात नत्र द्यावे. |
| टमाटे | | टमाटे पिकवाढीच्या अवस्थेनुसार योग्य काळजी घेणे गरजेचे असते. आंतरमशागत, पाणी आणि खत व्यवस्थापन, कीड-रोग नियंत्रण आदी बाबींचे नियोजन वाढीच्या अवस्थेनुसार करावे.<br>वाढते तापमान लक्ष्यात घेता टमाटे पिकातील फुलगळ नियंत्रणासाठी शेडनेटचा वापर करून पीक झाकून घ्यावे, पाण्याचा ताण बसणार नाही याकरिता पाण्याचे व्यवस्थापन करावे, रोग व किडींचे एकात्मिक व्यवस्थापन तसेच तज्ज्ञांच्यासल्ल्यानुसार एन.ए.ए. या वाढ संप्रेरकाच्या २० पीपीएम द्रावणाची फक्त फुलोऱ्यावर फवारणी करावी. |
| पशुधन | जनावरांची घ्यावयाची काळजी | भाकड शेळ्यांना पावसाळ्या अगोदर १५ दिवस १०० ते १५० ग्रॅम प्रतिदिन खुराक, भरडा दिल्यास बहुतांश शेळ्या काही दिवसांतच माजावर येतात व दोन पिले देण्याची शक्यताही वाढते. पैदाशीच्या बोकडालाही पावसाळ्या अगोदर १५ दिवस ३०० ते ३५० ग्रॅम प्रतिदिन भरडा/ खुराक दिल्यास वीर्याची प्रत सुधारते.<br>शेड बांधताना पक्षीगृहाची लांबी पूर्व- पच्छिम ठेवावी. वायुविजन व्यवस्था सक्षम असावी. उन्हाळ्यात गादीसाठी लाकूड भूश्याऐवजी तांदळाचा तूस किंवा भुईमुग टरफलांचा वापर करावा. गादी पद्धतीत वापरात येणाऱ्या तुसाची जाडी कमी (१ ते १.५ इंच) करावी. शेडमध्ये पक्ष्यांची संख्या किमान १० टक्क्यांनी कमी करावी. शेडमधील कामे सकाळीच उरकून घ्यावीत, दुपारच्या वेळेत कोणतीही कामे करू नयेत. जेणेकरून त्याचा ताण कोंबड्यांवर पडणार नाही.<br>जनावरांना उन्हात चरण्यासाठी नेऊ नये व स्वच्छ व थंड पाणी द्यावे.<br>वाळलेला चारा रात्री किंवा पहाटे जनावरांना खाऊ घालावा.<br>मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पशुवैद्यकाच्या सल्ल्याने जनावरांना जंतनाशक औषध पाजावे व शेवटच्या आठवड्यात लाळखुरकत, फऱ्या व घटसर्प या रोगांच्या एकत्रित रोगप्रतिबंधक लसी टोचून घ्याव्यात.<br>जनावरांना चा-यांची कमतरता असल्यास गव्हाच्या काडावर तज्ञांच्या सल्ल्यानुसार युरीयाची प्रक्रिया करुन जनावरांना खाऊ घालावे.<br>उन्हाचा वाढता परिणाम रोखण्याकरीता जनावरांच्या गोठ्यात कुलर / स्प्रिंकलर लावावे किंवा शेडच्या चोहो बाजूंनी पोते लावून त्यावर पाणी शिंपडावे जेणेकरून गोठ्यातील हवा थंड राहील.<br>पशुधनासाठी स्वच्छ, ताजे व मुबलक पिण्याचे पाणी उपलब्ध करावे.<br>जनावरांचे उष्णतेपासून संरक्षणासाठी गोठ्यात हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी व गोठ्याच्या भिंतींना बाहेरच्या बाजूने चुन्याची सफेदी द्यावी.<br>जनावरांचे उष्णतेपासून संरक्षणासाठी शेडचे बाजूने बारदान लावावे व छतावर गवत किंवा पेंढ्याचे अच्छादन करावे व हलके पाणी मारावे तसेच पशुधनासाठी शुध्द व पुरेसे थंड पाणी द्यावे.<br>पाळीव जनावरांस लाळ व खुरकत या रोगाच्या नियंत्रणासाठी दर सहा महिन्यांतून एकदा रोग प्रतिबंधक लस टोचुन घ्यावी. तसेच लागण झालेल्या जनावरांना इतर जनावरांपासुन बाजुला ठेवावे. |

**स्त्रोत** :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : ग्रामीण कृषि मौसम विभाग वेधशाळा विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिव

ठिकाण : विकृसंके, इगतपुरी

दिनांक : २६. ०५.२०२३

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, इगतपुरी**

**तथा सहयोगी संशोधन संचालक,**

**वि.कृ.सं.के., इगतपुरी, जि. नाशिक**